ePaper
भास्कर जाधव यांनी पुन्हा ब्राह्मण समाजाला डिवचले, स्टेटस ठेवल्याने नवा वाद
| वर्ष - 8 | अंक - 366 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- अर्जुन तेंडुलकरचा साखरपुडा!
- सुझानचा स्वभाव कसा आहे?
- 'मृत लोकांबरोबर चहा घेण्याचा अनुभव!
- महाराष्ट्राचा लचका तोडता येईल का?


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 14 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### ट्रम्प सल्लागार म्हणतात यात भारताचा काहीच तोटा नाही, आर्थिक स्थिती सुधारेल!

# ट्रम्प यांच्या 'टॅरिफ बॉम्ब'चे बुमरँग!

### भारताच्या चीनबरोबर मैत्रीमुळे ट्रम्प हादरले : आता 'घालीन लोटांगण' चा नवा अध्याय सुरू !

। नवी दिल्ली / न्यूयॉर्क /बीजिंग ।
प्रतिनिधी । महाईन्यूज



**मालेगावमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल तब्बल १७ वर्षांनी देण्यात आला. या प्रकरणातील सर्व सात आरोपींची निर्दोष मुक्तता झाली असून काँग्रेसच्या नेत्यांनी मांडलेला 'भगव्या दहशतवादा' चा मुद्दा खोटा ठरला असून त्याच्या बागुलबुवाचा फुगा फुटला आहे. 'फेक नॅरेटिव्ह' चालविल्याबद्दल काँग्रेसच्या नेत्यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला अडचणीत आणण्यासाठी 'टॅरिफ बॉम्ब' चे अस्त्र काढले खरे, पण त्याचे बुमरँग झाले असून ट्रम्प यांचा भारतापुढे 'घालीन लोटांगण' चा नवा अध्याय सुरू झाला आहे.

**भारताची आर्थिक झेप शक्य..**

ट्रम्प यांच्या आर्थिक सल्लागारांनी त्यांना सावध केले असून भारताने ही कडक पावले उचलली आहेत, त्यामुळे भारताचा काहीही तोटा होणार नाही उलट त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल, असे त्यांनी ट्रम्प यांना सुनावले आहे. त्याचप्रमाणे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील नव्या मैत्रीपर्वामुळे ट्रम्प हादरले आहेत.

**चीनच्या मैत्रीचा उतारा परफेक्ट..**

या आर्थिक नाकेबंदीच्या पार्श्वभूमीवर आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ वर भारताने शोधलेला चीनच्या मैत्रीचा उतारा योग्य प्रकारे लागू पडला असून ट्रम्प हे चांगलेच भांबावले आहेत. याचाच एक भाग म्हणून चीनचे परराष्ट्रमंत्री आणि भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट निश्चित झाली आहे.

**चीनचे परराष्ट्रमंत्री भारतात..**

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केल्यानंतर आंतरराष्ट्रीय कूटनीतीत नवा पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर चीनने भारताशी संबंध सुधारण्यासाठी पावले उचलली असून, चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी पुढील आठवड्यात भारत दौऱ्यावर येणार आहेत. या भेटीदरम्यान ते अजित डोवाल यांच्याशी चर्चा करणार आहेत. या महत्त्वपूर्ण चर्चेच्या वेळी अनेक करार देखील होणार आहेत, जे अमेरिकेला हानिकारक असतील.

**भारत, चीन यांच्यातील जवळीक..**

चीन आणि भारतासारख्या दोन मोठ्या शक्तींचे एकत्र येणे, हे अमेरिकेसाठी धोरणात्मक चिंतेचे कारण मानले जात आहे. ट्रम्प प्रशासन भारतावर रशियाकडून कच्चे तेल खरेदी थांबवण्याचा दबाव टाकत आहे. मात्र, भारताने स्पष्ट केले आहे, की आपले ऊर्जा-हित सांभाळूनच धोरण आखले जाईल. दरम्यान, अमेरिका पाकिस्तानसोबत जवळीक वाढवत असल्याच्या हालचाली दिसत आहेत. भारताला शह देण्यासाठी अमेरिकेचे हे पाऊल मानले जात आहे.

**भारत, रशिया, चीन त्रिकूट सक्रिय !**

रशिया आणि चीनशी भारताचे वाढते संबंध अमेरिकेला खूपच असून या तीन देशांची मैत्री त्यांना परवडणारी नाही, हे ट्रम्प यांच्या लक्षात आले आहे. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांचा दौरा सुरू होण्याआधीच भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर दि. २१ ऑगस्ट रोजी रशिया भेटीवर जाणार आहेत. गेल्या आठवड्यात अजित डोवाल यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी भेट घेऊन सुरक्षा, संरक्षण सहकार्य आणि आगामी नेतृत्वस्तरीय बैठकींची तयारी यावर चर्चा केली होती. डोवाल यांनी संकेत दिला आहे की पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर येतील.

**मोदींच्या चीन दौऱ्याकडे लक्ष**

पंतप्रधान मोदी एस सी ओ परिषदेसाठी चीनला जाणार असून त्याकडे सर्व जगाचे लक्ष आहे. भारत-चीन संबंध २०२० मधील गलवान खोऱ्यातील हिंसक संघर्षानंतर ताणलेले होते. तथापि, आता दोन्ही देश पुन्हा संवादाच्या मार्गावर आले आहेत. नरेंद्र मोदी हे दि. ३१ ऑगस्ट ते दि. १ सप्टेंबर दरम्यान चीनच्या तियानजिन शहरात होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होतील. या परिषदेच्या व्यासपीठावर रशिया आणि चीन दोन्ही देश उपस्थित राहतील.

**भारताच्या निर्यातीवर ताण..**

ट्रम्प टॅरिफचा आर्थिक परिणाम म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांच्या २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ घोषणेमुळे भारताच्या निर्यात बाजारावर ताण वाढू शकतो. विशेषतः स्टील, ॲल्युमिनियम आणि टेक्सटाईलसारख्या क्षेत्रांवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

## ट्रम्प यांना मोठा धक्का, भारतासाठी 'गुड न्यूज' !

अमेरिकेने भारतावर पन्नास टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला असला तरी भारताच्या आर्थिक सल्लागारांनी टॅरिफचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काहीही परिणाम होऊ शकणार नाही हे ठामपणे सांगितले आहे. दरम्यान, दुसरीकडे खुद्द अमेरिकेतील लोकांना देखील ट्रम्प यांच्या या भूमिकेवर विश्वास नसल्याचचे आता समोर आले आहे. एस अँण्ड पी ग्लोबल रेटिंग्सचे डायरेक्टर यीफार्न फुआ यांनी म्हटले आहे की यामुळे भारताची आर्थिक व्यवस्था आणखी सुधारेल. कारण भारत हा असा देश आहे, ज्याची अर्थव्यवस्था ही अधिक ट्रेड ओरिएंटेड इकोनॉमी नाही. या अंदाजानुसार टॅरिफनंतर देखील भारताच्या जीडीपी वाढीचा दर हा ६.५ टक्के राहणार आहे, म्हणजेच तो गेल्या वर्षी इतकाच राहणार आहे, त्यामुळे टॅरिफचा भारतावर कोणताही परिणाम होणार नाही, असा अंदाज व्यक्त होत आहे.

**लॉजिस्टिक पार्क**

## तळेगाव, चाकण परिसरात हजारो कोटींचा लॉजिस्टिक पार्क

# पुण्याच्या उद्योग क्षेत्रात महत्त्वाची घडामोड!

## हजारो कोटींचा लॉजिस्टिक पार्क



। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आपल्याकडे उद्योग आले म्हणजे, पुढचे सगळे काही आपोआप होईल, अशी सर्वसाधारण धारणा असते. या धारणेचा फटका पुण्यातील उद्योगांना वर्षानुवर्षे बसला आहे. पुण्याचे भौगोलिक स्थान आणि येथे उपलब्ध असलेले कुशल मनुष्यबळ या दोन गोष्टी उद्योगांना आकर्षित करणाऱ्या ठरतात. मात्र, गेल्या काही वर्षांत उद्योगांना पूरक पायाभूत सुविधा देण्यात सरकार आणि शासकीय यंत्रणा अपयशी ठरल्या. याचमुळे कधी हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्क, तर कधी चाकण औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या समस्या प्रकर्षाने समोर येतात. यात खुद्द राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांना लक्ष घालावे लागले आणि पायाभूत सुविधा विकासाची पावले पडू लागली..**

पुण्यातील तळेगाव परिसरात मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्क सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभा राहत आहे. तब्बल ३ हजार ४७ कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू असून, प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर पुण्यात मालवाहतुकीसाठी एकात्मिक रस्ते, लोहमार्ग आणि हवाई मार्गांचे जाळे निर्माण होणार आहे.देशात एकूण १५ मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्क उभी राहणार आहेत. त्यात जोगीघोपा (आसाम), चेन्नई, राज्यातील नागपूर व जालना, इंदूर आणि बंगळुरू येथे ६ मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्क उभारण्याचे काम सुरू आहे. याच वेळी राज्यात पुणे व नाशिक, हैदराबाद, अनंतपूर (आंध्र प्रदेश), पाटणा आणि वाराणसी येथील ६ लॉजिस्टिक पार्कची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. याबरोबर जम्मू, कोईमतूर आणि विशाखापट्टणम् येथील ३ लॉजिस्टिक पार्कची व्यवहार्यता तपासली जात आहे. तळेगावनजीक ३३४ एकरांवर हा लॉजिस्टिक पार्क उभा राहत आहे. या प्रकल्पाची माल हाताळणीक्षमता २०३५ पर्यंत वार्षिक २ कोटी टन असेल. या पार्कच्या माध्यमातून वाहननिर्मिती, अभियांत्रिकी, खाद्यप्रक्रिया, औषधनिर्माण, रसायने आणि धातू उद्योगाला फायदा होणार आहे. या पार्कमध्ये कंटेनर डेपो, ट्रक टर्मिनल, वाहनचालकांसाठी निवास सुविधा, हा प्रकल्प तीन टप्प्यांत पूर्णत्वास जाणार आहे. त्यातील पहिला टप्पा एप्रिल २०२८ पर्यंत पूर्ण केला जाणार असून, दुसरा १० वर्षांत आणि तिसरा १५ वर्षांत पूर्ण केला जाणार आहे. औद्योगिक क्षेत्रातील मालवाहतुकीचा कालावधी कमी करण्यात हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजाविणार आहे. पुण्यातील लॉजिस्टिक पार्क तळेगाव आणि चाकण औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात उभे राहणार आहे. ते द्रुतगती महामार्गाने मुंबईशी जोडले जाईल. याचबरोबर मुंबई-पुणे-बंगळुरू महामार्ग, पुणे-छत्रपती संभाजीनगर महामार्ग, पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग, वर्तुळाकार मार्ग आणि सध्याच्या लोहमार्गांच्या जाळ्यासह दिघी बंदराशी जोडले जाईल. प्रस्तावित पुरंदर विमानतळाशीही हे पार्क जोडले जाणार आहे. या पार्कच्या ६० किलोमीटर परिघात तळेगाव, चाकण, इंडोस्पेस इंडस्ट्रियल पार्क चाकण, पिंपरी-चिंचवड, खेड ही औद्योगिक क्षेत्रे आणि हिंजवडी आयटी पार्क, खेड, सीरम इन्स्टिट्यूट आणि खराडी नॉलेज पार्क आहेत.पुण्यातील तळेगाव परिसरात मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्क सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभा राहत आहे. तब्बल ३ हजार ४७ कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू असून, प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर पुण्यात मालवाहतुकीसाठी एकात्मिक रस्ते, लोहमार्ग आणि हवाई मार्गांचे जाळे निर्माण होणार आहे.देशात एकूण १५ मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्क उभी राहणार आहेत. त्यात जोगीघोपा (आसाम), चेन्नई, राज्यातील नागपूर व जालना, इंदूर आणि बंगळुरू येथे ६ मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्क उभारण्याचे काम सुरू आहे.

### ३३४ एकरांवर लॉजिस्टिक पार्क

पाटणा आणि वाराणसी येथील ६ लॉजिस्टिक पार्कची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. याबरोबर जम्मू, कोईमतूर आणि विशाखापट्टणम् येथील ३ लॉजिस्टिक पार्कची व्यवहार्यता तपासली जात आहे.तळेगावनजीक ३३४ एकरांवर हा लॉजिस्टिक पार्क उभा राहत आहे. या प्रकल्पाची माल हाताळणीक्षमता २०३५ पर्यंत वार्षिक २ कोटी टन असेल.

# खड्ड्यांच्या तक्रारींसाठी पुणेकर ॲपवर

## ‘पीएमसी रोड मित्र’वर पहिल्याच दिवशी इतक्या तक्रारी




। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील विविध भागांतील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची तक्रार महापालिकेकडे करता यावी, यासाठी महापालिकेने सुरू केलेल्या ‘पीएमसी रोड मित्र’ ॲपवर पहिल्या दिवशी ४३ तक्रारी आल्या आहेत. या तक्रारींची नोंद पथ विभागाच्या संबधित अभियंत्यांनी घेतली असून, त्याचे निवारण केले जाणार असल्याचे पथ विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.**

शहरातील अनेक रस्त्यांवर ख़ड्डे पडलेले असतात. त्याची तक्रार सर्वसामान्य नागरिकांना महापालिकेकडे करता यावी, यासाठी महापालिकेने हे ॲप सुरू केले आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते मंगळवारी या ॲपचे अनावरण झाले. त्यानंतर बुधवारी ॲपवर खड्ड्यांबाबत ४३ तक्रारी आल्या आहेत. या ॲपवर तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांना खड्डा पडलेल्या जागेचे दोन ते तीन फोटो, व्हिडिओ अपलोड करावे लागतात.ॲपच्या माध्यमातून करण्यात आलेल्या तक्रारींच्या फोटोंवर जागेचे स्थळ अक्षांश-रेखांश दर्शविण्यात येते. त्यामुळे आलेली तक्रार संबंधित भागातील पथ विभागाच्या कनिष्ठ अभियंत्याला परस्पर समजते. त्याची नोंद पथ विभागाच्या मुख्य कार्यालयातदेखील होते. तक्रार आल्यानंतर पथ विभागाच्या संबंधित अभियंत्याला प्रत्यक्ष जागेवर जाऊन खड्डा बुजवून त्याचे फोटो त्या तक्रारीच्या ठिकाणी अपलोड करावे लागणार आहेत. त्यानंतर दोन्ही फोटो संबंधित तक्रारदाराला पाहता येणार आहे. महापालिकेकडे आलेल्या प्रत्येक तक्रारीची दखल घेतली जाणार असून, ४८ ते ७२ तासांत काम पूर्ण करुन तक्रार निकाली काढली जाणार आहे.

### पहिल्या दिवशी ४३ तक्रारी

महापालिकेने सुरू केलेल्या ॲपच्या माध्यमातून आलेल्या प्रत्येक तक्रारीची नोंद होणार आहे. ही तक्रार कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे, याची सविस्तर माहिती देखील एसएमएसच्या माध्यमातून संबंधित तक्रारदाला कळविली जाणार आहे. त्यामुळे आलेली प्रत्येक तक्रार सोडविली जाणार असल्याचे पथ विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.


महापालिका अर्थसंकल्प २०२५-२६ नागरिकांच्या कल्पनांनी घडणार

# पिंपरी चिंचवडचा विकास!

## अर्थसंकल्पात नागरी सहभाग, १५ ऑगस्टपासून सूचना देता येणार

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अर्थसंकल्पात नागरिकांना त्यांचा सक्रिय सहभाग नोंदवता यावा, यासाठी महापालिका गेल्या काही वर्षांपासून उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये पुनावळे येथील नव्या रस्त्यांसाठी, चऱ्होलीतील सुधारीत पादचारी मार्गासाठी निधी देण्यापासून ते रावेतमधील नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. आता अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये देखील नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नागरिकांना १५ ऑगस्ट २०२५ पासून त्यांच्या सूचना देता येणार आहेत.**




-आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेला आठ प्रभागांतून २ हजार २७९ नागरिकांच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. छाननीनंतर त्यांपैकी ७८६ सूचना स्वीकारण्यात आल्या आणि नागरिकांनी सुचवलेल्या तब्बल ४९९ कामांना निधी देण्यात आला. नागरिकांनी सुचवलेल्या कामांसाठी ९४.८६ कोटी रुपये राखीव निधी ठेवण्यात आला होता. मात्र महापालिकेने नागरिकांनी सुचवलेल्या सामाजिक कामांना प्राधान्य देताना या कामांसाठी १३८.९८ कोटी रुपयांचा निधी वाटप केला.

ड प्रभागाला सर्वात जास्त लाभ

नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद केली जाते. त्यानुसार सर्वात जास्त लाभ ड प्रभागाला झाला आहे. या प्रभागातील पुनावळे, ताथवडे, वाकड आणि पिंपळे सौदागर परिसरात नागरिकांनी सुचवलेली विविध कामे पूर्ण करण्यात आली आहेत. येथे मुख्य रस्त्यांची कामे, ड्रेनेजची कामे आणि उद्यानांसाठी ४३.८८ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. ब प्रभागातील रावेत, किवळे या भागातील कामांसाठी २०.६० कोटी रुपयांचा निधी मिळाला. या निधीत रस्त्यांच्या कामांपासून रावेतमधील नवीन महापालिका शाळेपर्यंतची कामे समाविष्ट आहेत. शहरातील जवळपास सर्वच प्रभागांतून आलेल्या नागरिकांच्या सूचनांमध्ये रस्त्यांची कामे, पादचारी मार्ग, उद्यान सुधारणा, कचरा व्यवस्थापन अशा प्रमुख कामांचा समावेश होता. तसेच सर्वच प्रभागांत सार्वजनिक सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसविणे, थेरगावमध्ये शहरी रस्ता डिझाईन मानकांनुसार पादचारी मार्ग बांधणे आणि पिंपरी गावात रेल्वे उड्डाणपूल विकसित करणे अशा कामांचाही समावेश होता.

नागरिकांच्या सूचनांचा विचार करून आणि कामांचा प्राधान्यक्रम ठरवून अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे. आता नागरिकांकडून पुन्हा अर्थसंकल्प २०२६-२७ साठी सूचना मागवण्यात येणार असून त्याची सुरुवात १५ ऑगस्ट २०२५ पासून होणार आहे.

### अर्थसंकल्प २०२६-२७ असा नोंदवा अभिप्राय

- पिंपरी चिंचवडचा कोणताही रहिवासी अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये कोणते काम घ्यावे, याबाबत सूचना देऊ शकतो.
- पिंपरी चिंचवड महापालिका संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरून नागरिकांना सूचना देता येतील.
- नागरिकांना ऑफलाइन अर्ज भरण्याची सुविधा प्रत्येक प्रभाग कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद करण्यात येणार आहे.
- हा निधी रस्ते, पादचारी मार्ग, उद्याने, सार्वजनिक सुविधा, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, पथदिवे, सुरक्षा उपाय अशा कामांसाठी वापरला जाईल.

> “ अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग घेतल्याने अर्थसंकल्प सर्वसमावेशक होत असून यामुळे शहरातील गरजांनुसार नागरी सुविधांचा विकास होण्यास मदत होत आहे. अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये नागरिकांनी सुचवलेल्या कामांसाठी निधीची तरतूद केली आहे. आगामी अर्थसंकल्प २०२६-२७ साठी पुन्हा एकदा नागरिकांना सहभाग नोंदवता येणार आहे.
>
> **—शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

> “ नागरिकांनी सुचवलेल्या कामांसाठी ज्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात केली जाते, तो निधी त्याच कामासाठी खर्च होईल, याची काळजी घेतली जाते. हा निधी वाटपाची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडली जाते. यंदाही जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन अर्थसंकल्प २०२६-२७ साठी कामे सुचवावीत.
>
> **— प्रवीण जैन,**

---

# पिंपरीत गोळीबार करणारा निघाला रवी पुजारी गँगचा शूटर

## बांधकाम व्यावसायिकांना टार्गेट; सहा वेळा गोळीबार; चिंचवडला बाईक चोरून पिंपरीत केला गोळीबार

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी येथे भरवस्तीत गोळीबार करून दुकानदाराला गंभीर जखमी करणारा आरोपी कुख्यात रवी पुजारी टोळीचा शूटर असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. यापूर्वी त्याने सहा वेळा गोळीबार केला असून बांधकाम व्यावसायिकांना टार्गेट करण्याचा त्याचा गुन्हेगारी पॅटर्न आहे. चिंचवड परिसरातून मोटारसायकल चोरी करून त्याने पिंपरीत येथे गुन्हा केला होता. पैशाची चणचण भासल्याने त्याने हे कृत्य केल्याची कबुली दिली आहे.**



रविंद्र भाऊसाहेब घारे (४०, रा. ताम्हाणे वस्ती, टॉवर लाईन, चिखली, मुळगाव ओझर्डे, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

घटनेचा तपशील

दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेला आरोपी “दस वाला फ्रुटी दे” असे म्हणत पिंपरी येथील दुकानात घुसला. व्यापारी तरुण फ्रिजमधून फ्रुटी देत असताना त्याने गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्याचा प्रयत्न केला. चैन न तुटल्याने आरोपीने पिस्तूल दाखवत धमकावले आणि पुन्हा ओढली. अर्धी चैन मिळाल्यानंतर उर्वरित मिळवण्यासाठी त्याने पिस्तूलने तरुणाच्या डाव्या मांडीवर गोळी झाडली.


पोलिसांची दहा पथके होती मागावर

गुन्ह्याच्या गांभीर्याचा विचार करून पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी १० पथके तयार करून शोधमोहीम सुरू केली. मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ७०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. आरोपीने हेल्मेट, रेनकोट तसेच मोबाईल न वापरता पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तरीही शरीरयष्टीवरून ओळख पटवत ६ ऑगस्ट रोजी चिखली येथून आरोपीला अटक करण्यात आली.

गुन्हेगारी पार्श्वभूमी

आरोपी घारे हा रवी पुजारी व सुरेश पुजारी टोळीचा सदस्य असून सुपारी घेऊन खंडणी, खून, जबरी चोरी करणारा शार्पशूटर आहे. नवी मुंबईतील बांधकाम व्यावसायिकावर गोळीबार प्रकरणी मोक्का अंतर्गत कारवाई झाल्यानंतर तो फरार होता.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### देहाचे भोग आणि आनंद.

तुम्हाला आपल्या हिताकरिता दुसऱ्याच्या उपयोगी पडणे जरुर आहे. तुम्ही असे नाही म्हणता कामा की, परमात्म्यानेच याला अशा स्थितीत ठेवला आहे, त्याच्या विरुद्ध कसे जावे ? तुम्हाला परमात्म्याच्या विरुद्ध जाणे शक्यच नाही, पण आपल्या हिताकरिता, म्हणजे आपली देहबुद्धी कमी होण्यासाठी, दुसऱ्याच्या उपयोगी पडणे जरूर आहे. जसे लहान मुलांना खाऊ वगैरे दिला म्हणजे घरच्या यजमानाला पोहोचतो, तद्वत् लोकांच्या उपयोगी पडले म्हणजे ते परमात्म्याला पोहोचते.

परमात्म्याने पाठविलेली दुखणी, संकटे यात आनंद मानला पाहिजे. एखाद्या आजारी माणसाची देहकष्ट घेऊन शुश्रूषा करायला मी जर तुम्हाला सांगितली, तर ते काम तुम्ही आनंदाने कराल. सद्‌गुरूंनी आपल्याला हे काम सांगितले याचा आनंदच वाटेल. मग परमात्म्याच्या इच्छेने येणारी दुखणी, संकटे, यांचाही तुम्ही का नाही मानू आनंद ? पण परमात्मा आपला सर्वस्वी हितकर्ता आहे असा तुमचा दृढ विश्वास आहे कुठे ? परमात्म्यानेच धाडलेली संकटे त्यालाच दूर करायला कशी सांगावीत ? दुसरे असे की, भोग हा भोगलाच पाहिजे. आता जर भोगला नाही, तर पुढे तरी भोगावा लागणारच ना ?

देह सुस्थितीत असला म्हणजे देहाचा विसर पडतो असे तुम्ही म्हणता; पण तुम्हाला देहाचा खरा विसर कधीही पडत नाही. त्याची आठवण सामान्यपणे असतेच. दुखणे वगैरे आले म्हणजे ती विशेषपणाने भासते इतकेच. दुखणे आणि त्याचे दुःख ही दोन निराळी असल्यामुळे, दुखणे आले तरी मनुष्याला आनंदात राहता येईल. ज्याच्याजवळ भगवंत असेल त्यालाच आनंदाचे जगणे प्राप्त होईल; म्हणून ज्याला आनंदात जगायचे आहे त्याने नाम घ्यावे, आणि भगवंताच्या अनुसंधानात राहावे. अनुसंधान कशाला म्हणावे ? उठणे, बसणे, जप करणे, वाचन करणे, गप्पागोष्टी करणे, चेष्टा-विनोद करणे, वगैरे सर्व क्रियांमध्ये भगवंताशी संबंध आणि संदर्भ असावा, हेच अनुसंधान. भगवंताचे अनुसंधान आपल्याला भगवंताकडे घेऊन जाते. ' मी अनुसंधान टिकवीन ' असा मनाचा निश्चय करावा. जगाच्या प्रवाहात उलट पोहणे म्हणजे भगवंताचे अनुसंधान टिकविणेच होय. भगवंताचे होऊन प्रपंच करणे ही सर्वश्रेष्ठ कला आहे. भक्ताला ही कला अवगत झाल्याने भक्त भगवंतमय होऊन त्याला सर्व जगतात आनंदच दिसतो.

बोधवचन:- देहाची सुखदुःखे प्रारब्धावर टाकू या आणि नामस्मरण प्रयत्नाने व प्रेमाने करू या.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**भारताचा स्वातंत्र्य दिन आपण जल्लोषात मोठ्या दिमाखात साजरा करतो. पण, त्यावेळी झालेली भारत पाकिस्तानची फाळणी मात्र क्लेषदायक, दुःखद आणि दुर्दैवीच म्हणावी लागेल !**

# भारत-पाकिस्तान फाळणी, अत्यंत दु:खद, दुर्दैवी घटना !



### विभाजन विभीषिका दिवस..

दि. १४ ऑगस्ट २०२१ पासून आपण 'विभाजन विभीषिका' स्मृती दिवस म्हणजेच 'भयकारी फाळणी स्मृती दिन' पाळायला सुरू केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार हा दिवस पाळण्यात येऊ लागला, म्हणजे फाळणी झाल्यापासून बरोब्बर ७४ वर्षांनंतर ! याचाच अर्थ असा की भारतीय समाजमानसामध्ये या भयकारी प्रलयंकारी फाळणीच्या आठवणी, वेदना अजूनही जिवंत आहेत.. ठसठसत आहेत !

### वेदना अनुभवणारे खूपच कमी..

आता, या वेदना अनुभवलेली किंवा पाहिलेली मंडळी फारच कमी शिल्लक आहेत. अशा भयकारी दिवसाची स्मृती का बरे करायची? आठवणींचा अंधार का बरे आठवायचा ? एकतर आपल्या पुढील पिढीला देशाचा येणारा स्वातंत्र्य दिवस काय किंमत मोजून मिळाला, हे कळणे अत्यावश्यक आहे. असे करणे का बरे अत्यावश्यक आहे ? तर हे स्वातंत्र्य मिळवताना आपण हजारो वर्षापासून असलेल्या आपल्या भारतभूचा एक भाग गमावला, हे कळले पाहिजे. त्याचवेळी आपल्या लाखो देशबांधवांच्या या फाळणीच्या वेळी झालेल्या कत्तली हेही समजले पाहिजे.

### पुन्हा हा काळाकुट्ट इतिहास नको

उद्या परत आपल्या देशावर ही वेळ येऊ नये, यासाठी हा काळाकुट्ट इतिहास नीटसा माहिती नको का ? आपल्या मुलांना, नातवांना, पतवंडाना अशा कत्तलीना तोंड द्यावे लागू नये, म्हणून त्यांना हे कळणे गरजेचे आहे, नाहीतर पुढील पिढीचे आपण अपराधी, गुन्हेगार ठरू हे निश्चित ! याचा सारासार विचार करूनच या लेखासाठी तयारी केली आहे.

### फाळणीची वस्तुस्थिती काय ?

ब्रिटीशांचे फोडा,झोडा आणि राज्य करा हे धोरण. धर्म, जात, पंथ, प्रदेश असे अनेक भेद आपल्यामध्ये निर्माण करून भारतीयांना एकमेकात झुंजत ठेवले.फाळणी ही फक्त धर्माच्या आधारावर झाली. मुस्लीम समाजाने स्वातंत्र्यपूर्व काळात झालेल्या निवडणुकीत पाकिस्तानच्या मागणीला एकमुखाने पाठिंबा दिला होता, हे नेहमी ध्यानात ठेवले पाहिजे. दि. १६ ऑगस्ट १९४६ ला 'डायरेक्ट ॲक्शन' या मोहम्मद अली जिनांच्या आदेशानुसार देशभर, विशेषतः कलकत्ता आणि नौखालीत एका दिवसात हजारो हिंदूंच्या कत्तली करून दहशत निर्माण केली गेली. खड्ग हातात धरून आणि रक्त सांडून मुस्लिमांनी पाकिस्तान मिळवले, हे महत्त्वाचे !

### एक भाग मुस्लिमांचा, दुसरा धर्मनिरपेक्ष !

जेव्हा धर्माच्या आधारावर फाळणी झाली, तेव्हा एक भाग मुस्लिमांना दिला गेला, तर नैसर्गिक न्यायाने उरलेला भाग हिंदूना मिळायला हवा होता. पण, तो सेक्युलर म्हणजेच धर्मनिरपेक्ष झाला. फक्त, हिंदूच सेक्युलर असू शकतात. इतिहास सांगतो मुस्लीम आक्रमणानंतर धर्मभ्रष्ट व्हायच्या भीतीने पारशी भारतात आले आणि दुधातील साखरेप्रमाणे मिसळून गेले. ख्रिश्चन आणि मुस्लीम, आक्रमणाच्या भीतीने आलेले ज्यू भारतीय जीवनाशी एकरूप झाले. त्यापूर्वीच्या इतिहासात शक आले, हूण आले आणि येथील संस्कृतीशी एकरूप झाले. हा इतिहासही ताजा आहे.

### भारत हा सर्व समावेशक..

त्यामुळे, एक गोष्ट स्पष्ट दिसते, ती म्हणजे भारत हाच एक असा देश आहे, जो सगळ्यांना सामावून घेऊन शकतो, मुस्लिमांचे ७२ फिरके एकत्र सुखाने फक्त भारतात नांदतात. इतर कोणत्याही मुस्लीम देशात नाही. १९४७ साली स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानमधे २०.५ टक्के हिंदू होते. न्यू यॉर्क टाइम्सच्या आकड्यानुसार १९९८साली पाकिस्तानमध्ये १.६ टक्के हिंदू शिल्लक राहिले. तर भारतात १९४७ साली ९.८ टक्के मुसलमान होते. २०११ च्या जनगणनेनुसार १४.२३ टक्के मुसलमान लोकसंख्या भारतात आहे, आज निश्चितच ती त्याहून जास्त असावी, हे वेगळे सांगायला नको !

### फाळणीबाबत विचाराचे मुद्दे..

धर्माच्या आधारावर फाळणी होऊनसुद्धा भारताने मुस्लिमांना सामावून घेतले, याची जाणीव समाज म्हणून मुस्लीम समाजात आहे का ? हिंदू आणि मुसलमान या दोघांनी विचार करावा, की मुसलमान समाजाने भारताचा हजारो वर्षाचा सांस्कृतिक वारसा, इतिहास, वेशभूषा, भाषा, खानपान, या सगळ्यांशी गेल्या ऐंशी वर्षात किती जुळवून घेतले आहे ? आपले पंतप्रधान नेहमी १४० कोटी भारतीयांचा उल्लेख करतात, पण कटाक्षाने मुस्लीम समाजाचा वेगळा उल्लेख कधीही करत नाहीत, तरीही, भारतीय मुस्लिमांना असुरक्षित का वाटते ? ते स्वतःला या १४० कोटींपेक्षा वेगळे समजतात का? जगामधे सर्वात जास्त दोन नंबरची मुस्लीम लोकसंख्या भारतात असताना ते स्वतःला अल्पसंख्यांक का म्हणवतात?

### रोहिंग्यांविषयी एवढे प्रेम का?

रोहिंग्या मुस्लिमांसाठी मुंबईत एवढे मुसलमान का एकवटतात? अतिरेक्यांच्या शवयात्रेला एवढ्या मोठ्या संख्येने हा समाज का उपस्थित राहतो? आजही सर तन से जुदा का होते? त्याचप्रमाणे, हमास आतंकवाद्यांसाठी भारतात आंदोलने का होतात ? हे न सुटणारे आणि मेंदूला झिणझिण्या आणणारे आहेत.

### समाधानकारक उत्तरे शोधण्याची वेळ..

या सर्व प्रश्नांची उत्तरे समाज म्हणून एकत्रितपणे आपण शोधली नाहीत, तर परत एकदा नव्या फाळणीला तोंड द्यावे लागेल, असे वाटत नाही काय? परत आपल्या मुलाबाळांच्या, नातवंडांच्या, कत्तलींना तोंड द्यावे लागेल, असे भय वाटत नाही का ? शहामृगाप्रमाणे वाळूत तोंड खुपसून बसून, 'ऑल इज वेल' असे म्हणून खरेच सगळे शुभ आणि मंगल होणार आहे का ? या फाळणीच्या आठवणी अतिशय दुःखद आणि दुर्दैवी आहेत. तो प्रसंग यापुढे कोणावरही येऊ नये, एवढीच मनापासून तीव्र इच्छा आहे आणि ती सर्वच भारतीयांची आहे हे नक्की!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## ठाकरेंची विनंती लोकशाही सर्वोच्च न्यायालयाच्या उंबरठ्यावर तडफडते

# महाराष्ट्राचा लचका तोडता येईल का?

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईचा लचका किंवा महाराष्ट्राचा लचका तोडता येईल का? याचा प्रयत्न अजूनही केला जातो आहे. हे प्रयत्न जोपर्यंत थांबत नाहीत असे प्रयत्न करणाऱ्यांना आपण संपवत नाही तोपर्यंत मार्मिक आणि शिवसेनेचं काम थांबणार नाही असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मार्मिकचा वर्धापन दिन सोहळा मुंबईत पार पडला. त्या कार्यक्रमात उद्धव ठाकरेंनी हे वक्तव्य केलं आहे.**



शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत, इतर प्रश्न आहेत. पण आमचं लक्ष भरकटवलं जातं आहे, कुठे तर कबुतरांकडे? भटक्या कुत्र्यांकडे. मी येताना बातमी वाचली भटक्या कुत्र्यांना शेल्टरमध्ये डांबून ठेवा. यानंतर देशभरात यावरुन विरोध दर्शवला जातो आहे. भाजपाच्या मनेका गांधी म्हणाल्या की कुत्र्यांना डांबलं तर झाडांवरची माकडं खाली येतील. माकडं खाली आली आहेत. संसदेत बसली आहेत. मी हे उपाहासाने बोलत नाही, जयराम रमेश यांनी खुर्चीवर माकड बसल्याचा फोटो पोस्ट केला होता म्हणून बोलतो आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले.देशाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांना धन्यवाद द्यायचे आहेत. देशभरातून भटक्या कुत्र्यांच्या निर्णयाविरोधात संतापाची लाट निर्माण झाली आहे. त्यांनी जाहीर केलं आहे की मी स्वतः त्यात लक्ष घालेन. याला म्हणतात कर्तव्यदक्ष सरन्यायाधीश. त्याच सरन्यायाधीशांना मी विनंती करतो आहे की आपल्या न्यायालयाच्या उंबरठ्यावर देशाची लोकशाही तडफडते आहे. तीन ते चार वर्षे झाली ती कधी प्राण सोडेल माहीत नाही. खटला कोर्टात दाखल झाल्यापासून आता आपण चौथे सरन्यायाधीश आहात. लोकशाहीच्या तोंडात न्यायाचं पाणी जर नाही घातलं तर देशाची लोकशाही मरेल. त्यामुळे आपण त्यातही ही लक्ष घाला ही मी हात जोडून तुम्हाला विनंती करतो आहे. असंही उद्धव ठाकरे म्हणाले. शिवसेनेचा जो खटला सर्वोच्च न्यायालयात आहे त्याबाबत उद्धव ठाकरेंनी हे विधान केलं.उद्धव ठाकरे म्हणाले, नोकऱ्या नाहीत, तरीही सगळं चांगलं चाललं आहे.

ट्रम्प दम देतात, मतांची चोरी समोर आली तरीही सगळं छान चाललं आहे. या सगळ्यात आपल्या राज्याची जी काही संस्कृती आहे त्याचा आपला विसर पडत चालला आहे. मार्मिकमध्ये व्यंगचित्रांच्या माध्यमातून जनजागृतीचं काम केलं, अनिष्ट प्रथा-परंपरांवर बोट ठेवण्याचं काम केलं असंही उद्धव ठाकरे म्हणाले. विंचू चावला हे एकनाथ महाराजांचं भारुड आहे. तोतया एकनाथांचं नाही असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला आहे. साधू संतांची जी काही शिकवण आहे ती आपल्याला कायमच मार्ग दाखवत आली आहे. पूर्वी एका चित्रपटात गाणं होतं जगात नाही राम रे, दाम करी काम. ते आत्ता असतं तर भाजपावल्यांनी बंदी घातली असती. म्हणाले असते की हा जगात नाही राम म्हणतो. पण त्याच्या पुढची ओळ महत्त्वाची आहे, दाम करी काम. आत्ताही तशीच स्थिती आहे. एकीकडे जय श्रीराम म्हणायचं आणि पैसे देऊन धुमाकूळ घालायचा हे या नासलेल्या लोकांच्या सरकारमध्ये चाललं आहे असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत, इतर प्रश्न आहेत. पण आमचं लक्ष भरकटवलं जातं आहे, कुठे तर कबुतरांकडे? भटक्या कुत्र्यांकडे. मी येताना बातमी वाचली भटक्या कुत्र्यांना शेल्टरमध्ये डांबून ठेवा. यानंतर देशभरात यावरुन विरोध दर्शवला जातो आहे. भाजपाच्या मनेका गांधी म्हणाल्या की कुत्र्यांना डांबलं तर झाडांवरची माकडं खाली येतील. माकडं खाली आली आहेत. संसदेत बसली आहेत. मी हे उपाहासाने बोलत नाही, जयराम रमेश यांनी खुर्चीवर माकड बसल्याचा फोटो पोस्ट केला होता म्हणून बोलतो आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले. देशाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांना धन्यवाद द्यायचे आहेत.

### ती कधी प्राण सोडेल माहीत नाही

देशभरातून भटक्या कुत्र्यांच्या निर्णयाविरोधात संतापाची लाट निर्माण झाली आहे. त्यांनी जाहीर केलं आहे की मी स्वतः त्यात लक्ष घालेन. याला म्हणतात कर्तव्यदक्ष सरन्यायाधीश. त्याच सरन्यायाधीशांना मी विनंती करतो आहे की आपल्या न्यायालयाच्या उंबरठ्यावर देशाची लोकशाही तडफडते आहे. तीन ते चार वर्षे झाली ती कधी प्राण सोडेल माहीत नाही.

# शासकीय निवासस्थान कधी सोडणार?

## आतापर्यंत सातपुडा हे शासकीय निवासस्थान का मी रिक्त केलं नाही?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे हे वेगवेगळ्या मुद्यांवरून चांगलेच चर्चेत आहेत. धनंजय मुंडे यांचं मंत्रिपद जाऊन तब्बल पाच महिने उलटले आहेत. मात्र, तरीही त्यांनी मुंबईतील सातपुडा हे शासकीय निवासस्थान अद्याप सोडलेलं नाही. त्यामुळे विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीकेची झोड उठवली आहे.**




दरम्यान, धनंजय मुंडे यांनी मुंबईत आपलं कुठेही घर नसल्यामुळे सातपुडा हे शासकीय निवासस्थान सोडलं नसल्याचं स्पष्टीकरण याआधी दिलं होतं. मात्र, धनंजय मुंडे यांनी स्वतः:च विधानसभा निवडणुकीवेळी उमेदवारी अर्जासह दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात मुंबईतील गिरगाव चौपाटीवर असलेल्या एका सदनिकेचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मुंबईत घर असूनही धनंजय मुंडे यांनी अद्याप शासकीय निवासस्थान का सोडलं नाही? यावरून विरोधकांनी सवाल उपस्थित केले आहेत.तसेच या संदर्भात माध्यमांमध्ये बातम्या आल्या होत्या.

दरम्यान, त्यानंतर अखेर धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया देत आपण आतापर्यंत सातपुडा हे शासकीय निवासस्थान का रिक्त केलं नाही? तसेच आपण सातपुडा शासकीय निवासस्थान कधी सोडणार? याबाबत आता स्वतः:च स्पष्टीकरण दिलं आहे."मुंबई शहरातील सातपुडा हे शासकीय निवासस्थान मी रिक्त केले नसल्याबाबत माध्यमांमध्ये वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. मुंबईतील माझी सदनिका सध्या राहण्यासाठी योग्य नसून त्याठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे.

### भाड्याने घर मिळणं कठीण

शिवाय माझ्या लहान मुलीची शाळा याच भागात असून माझ्या विविध आजारांवरील उपचारार्थ देखील मला मुंबईत राहणं गरजेचं आहे. मात्र या परिसरात तातडीने भाड्याने घर मिळणं सध्या कठीण आहे, माझा शोधही सुरु आहे. माझ्या सदनिकेचं काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार असून तशी शासनाकडे विनंती केली आहे", असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.

व्हिडीओ केला शेअर

## राहुल गांधींनी : निवडणूक आयोगाचे मानले आभार

# ‘मृत लोकांबरोबर चहा घेण्याचा अनुभव!

### आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर टीका करत मतदान प्रक्रियेत घोळ झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. काही दिवसांपूर्वी राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत काही पुराव्यांचं सादरीकरण करत मतदान प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या आरोपानंतर देशभरात एकच खळबळ उडाली. यावरून राजकीय प्रतिक्रियाही उमटल्या.**



लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप करत राहुल गांधी केंद्रीय निवडणूक आयोगाला सातत्यानं लक्ष्य करत आहेत. राहुल गांधी यांनी बंगळुरू येथील महादेवपुरा मतदारसंघातील मतदार याद्यांचे परीक्षण केल्याचं सांगत भाजपा व निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर आता राहुल गांधींनी पुन्हा एकदा निवडणूक आयोगावर खोचक टीका केली आहे.निवडणूक आयोगाने मतदार यादीमध्ये ज्या मतदारांना मृत दाखवलं होतं, त्यांच्याबरोबर राहुल गांधींनी चहा घेतला आहे. तसेच त्यांच्याबरोबर चहा घेत ‘चाय पे चर्चा’ केल्याचा एक व्हिडीओ राहुल गांधींनी एक्सवर (ट्विटर) शेअर केला आहे. ज्या मतदारांना मतदार यादीत मृत दाखवण्यात आलं, त्यांच्याबरोबर चहा पिण्याचा अनुभव आल्याचं सांगत राहुल गांधींनी निवडणूक आयोगाचे खोचकपणे आभार मानले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.राहुल गांधी यांनी एक व्हिडीओ शेअर केला आहे आणि त्या व्हिडीओला दिलेल्या कॅप्शनमध्ये म्हटलं की, “मला आयुष्यात अनेक मनोरंजक अनुभव आले आहेत. मात्र, ‘मृत लोकां’बरोबर चहा घेण्याचा अनुभव कधीच आला नव्हता. या अनोख्या अनुभवासाठी निवडणूक आयोगाचे आभार”, असं राहुल गांधींनी म्हटलं आहे.राहुल गांधी यांनी गेल्या आठवड्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावर एकापाठोपाठ एक आरोपांचा भडिमार केला. त्यांचा पहिला आरोप हा निवडणुकीच्या वेळापत्रकासंदर्भातला होता. “भारतात एक काळ असा होता की, जेव्हा ‘ईव्हीएम’ नसताना सगळा देश एकाचवेळी मतपत्रिकेवर मतदान करायचा; पण आताच्या काळात अनेक महिने मतदानाची प्रक्रिया चालते. मतदानाचे इतके टप्पे का केले जातात, यावरून साशंकता निर्माण होते. बऱ्याचदा निवडणुकीचं वेळापत्रक बदललं जातं, हे सगळं निवडणूक नियंत्रित करण्यासाठी

### आयोगाचे खोचकपणे आभार

गांधींनी निवडणूक आयोगाचे खोचकपणे आभार मानले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.राहुल गांधी यांनी एक व्हिडीओ शेअर केला आहे आणि त्या व्हिडीओला दिलेल्या कॅप्शनमध्ये म्हटलं की, “मला आयुष्यात अनेक मनोरंजक अनुभव आले आहेत. मात्र, ‘मृत लोकां’बरोबर चहा घेण्याचा अनुभव कधीच आला नव्हता. या अनोख्या अनुभवासाठी निवडणूक आयोगाचे आभार.

केलं जातं”, असा आरोप राहुल गांधींनी केला होता. राहुल गांधींनी केलेला हा सगळ्यात मोठा आरोप मतचोरीचा आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या मतचोरीचा संशय अधिक बळकट झाला आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. गेल्या पाच वर्षांत जितके नवे मतदार जोडले गेले नाहीत, तितके पाच महिन्यांत जोडण्यात आले. मतदानाच्या दिवशी सायंकाळी पाच वाजेनंतर अचानकच मताधिक्यात वाढ होणे, बनावट मतदारांनी मतदान करणे, मतदार यादीत मतदारांचे खोटे पत्ते व अवैध फोटो असणे, कर्नाटकच्या महादेवपुरा मतदारसंघात एक लाख मतदारांची वाढ होणे, असे असंख्य आरोप राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर केले आहेत.लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप करत राहुल गांधी केंद्रीय निवडणूक आयोगाला सातत्यानं लक्ष्य करत आहेत. राहुल गांधी यांनी बंगळुरू येथील महादेवपुरा मतदारसंघातील मतदार याद्यांचे परीक्षण केल्याचं सांगत भाजपा व निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर आता राहुल गांधींनी पुन्हा एकदा निवडणूक आयोगावर खोचक टीका केली आहे.निवडणूक आयोगाने मतदार यादीमध्ये ज्या मतदारांना मृत दाखवलं होतं, त्यांच्याबरोबर राहुल गांधींनी चहा घेतला आहे. तसेच त्यांच्याबरोबर चहा घेत ‘चाय पे चर्चा’ केल्याचा एक व्हिडीओ राहुल गांधींनी एक्सवर (ट्विटर) शेअर केला आहे. ज्या मतदारांना मतदार यादीत मृत दाखवण्यात आलं.

## मुझफ्फरपूर महापौरांकडे दोन मतदार ओळखपत्रे

# ‘बिहारमध्ये मतचोरीसाठी निवडणूक आयोगाचे भाजपशी संगनमत’

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**‘मतचोरी’साठी निवडणूक आयोगाने भाजपशी संगनमत केल्याचा आरोप राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) नेते तेजस्वी यादव यांनी बुधवारी केला. भाजप नेते दोन मतदार ओळखपत्रे मिळवून देण्यात मदत करीत असल्याचेदेखील ते म्हणाले. तसेच मतदारयादीतील कथित अनियमितता दूर न केल्यास ‘राजद’ विधानसभा निवडणुकांवर बहिष्कार टाकू शकते, असा पुनरुच्चारही त्यांनी केला.**



सिन्हा यांनी यादव यांचे आरोप फेटाळून लावले व कायदेशीर कारवाईचा इशाराही दिला. तसेच यादव यांनी स्वत:चीच कागदपत्रे जाहीर करावी ज्यात दोन वेगवेगळ्या जन्मतारखा असल्याचा पलटवारही केला. दरम्यान, भाजपने यादव यांचे आरोप खोटे आणि दिशाभूल करणारे असल्याची टीका केली. विशेष सखोल फेरनिरीक्षणच्या प्रारंभीच्या प्रक्रियेनंतर आयोगाने ने प्रकाशित केलेल्या मसुदा मतदार यादीला मतांची ‘लूट’च म्हटले पाहिजे.

आयोग राज्यातील भाजप नेत्यांना दोन मतदार ओळखपत्रे मिळविण्यात मदत करत आहे. जेव्हा निवडणूक आयोग स्वतः एकाच मतदारसंघात हे करत आहे, तेव्हा ‘एसआयआर’चा अर्थ काय? याचा अर्थ निवडणूक आयोग एकाच घरातील भाजप समर्थकांसाठी अनेक बनावट मतदार तयार करण्यास मदत करत आहे मुझफ्फरपूरच्या महापौर निर्मला देवी यांच्याकडे दोन मतदार ओळखपत्रे असल्याचा आरोपदेखील यादव यांनी केला. निर्मला देवी भाजपच्या प्रमुख नेत्या असून आगामी विधानसभा निवडणुकीत त्या भाजपच्या संभाव्य उमेदवारही असल्याचे यादव म्हणाले.

### गुजरातचे रहिवासी बिहारचे मतदार

एका विधानसभा मतदारसंघातील दोन वेगवेगळ्या बूथचे दोन मतदार ओळखपत्र आहेत, असे सांगतानाच त्यांनी मतदार ओळखपत्र आरईएम१२५१९१७ आणि जीएसबी १८३५१६४ चा दाखला देत यात वेगवेगळ्या वयोगटांचा उल्लेख असल्याचा दावादेखील केला. तसेच एसआयआरच्या पहिल्या टप्प्यात त्यांनी दोन वेगवेगळे अर्ज केले असावेत, अशी शंकाही व्यक्त केली.

# गर्लफ्रेंडसाठी बँकेत नोकरी ते इंडस्ट्रीत एन्ट्री

बॉलीवूडसह मराठी सिनेविश्वात आपल्या अभिनय आणि दिग्दर्शनाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारे अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक म्हणजे महेश मांजरेकर. आजवर त्यांनी अनेक लोकप्रिय चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. बॉलीवूडसह मराठी इंडस्ट्रीला अनेक दर्जेदार चित्रपटांची पर्वणी घडवून आणणाऱ्या महेश मांजरेकरांनी एकेकाळी गर्लफ्रेंडच्या सांगण्यावरुन बँकेत नोकरी केली होती. पण इथेही त्यांचं मन रमलं नाही. त्यामुळे त्यांनी या नोकरीचा राजीनामा दिला आणि पुन्हा आपल्या आवडीच्या क्षेत्रात एन्ट्री घेतली. महेश मांजरेकरांनी नुकताच लोकमत फिल्मीशी संवाद साधला. या संवादात त्यांनी त्यांच्या गर्लफ्रेंड, नोकरी आणि त्यांच्या या क्षेत्रातील एन्ट्रीबद्दल सांगितलं. याबद्दल महेश मांजरेकर असं म्हणाले की, "माझी एक गर्लफ्रेंड होती. तिचं म्हणणं होतं की, नोकरी करायची. कारण



व्यवसाय अनिश्चित असतो. मग हे सगळं करत असताना बँकेची प्रवेश परीक्षा दिली. त्यानंतर निकाल येईपर्यंतच्या वेळेत मी नगरला जाऊन हापसे (बोअरवेल) खणले. ते दिवस चांगले होते. तेव्हा खूप मज्जा केली."यापुढे ते म्हणाले, "तेव्हा मी त्या कंपनीचा मॅनेजर होतो. माझ्या मित्राच्या काकाचीच ती कंपनी होती. घरापासून बाहेर राहणं काय असतं हे मी त्या काळात अनुभवलं. कुठेही राहण्याची तयारी असणं आणि जे मिळेल ते खाणं ही सवय मला तिकडे लागली. तेव्हा गर्लफ्रेंडच्या घरचे पण नोकरी बघ, नोकरी बघ असं सांगत होते. मग बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये मला नोकरी लागली. बोअरवेलमध्ये जिथे कामाला होतो; तिथे तो सांगत होता की, तुला बँकेत मिळतात त्यापेक्षा तिप्पट पैसे देतो. पण गर्लफ्रेंडला नोकरीत अधिक सुरक्षितता वाटत होती. त्यामुळे मग शेवटी बँकेत नोकरी केली."यापुढे महेश मांजरेकरांनी सांगितलं की, "बँकेत काही केल्या मन लागत नव्हतं. तिकडे माझी खूप चिडचिड व्हायची. मी कायम अस्वस्थ होतो. जिथे रस्ता मिळेल तिथे गेलो आहे. त्यामुळेच आजवर इथे पोहोचलो आहे.

## स्टँकोविकचा एक्स बॉयफ्रेंड प्रसिद्ध अभिनेत्रीला करतोय डेट

अभिनेता अली गोनी व अभिनेत्री जास्मिन भसीन जवळपास ५ वर्षांपासून एकत्र आहेत. या दोघांची पहिली भेट २०१८ मध्ये रोहित शेट्टीच्या रिॲलिटी 'शो खतरों के खिलाडी'मध्ये झाली होती. या शोच्या शूटिंगसाठी अर्जेंटिनामध्ये एकत्र घालवल्यामुळे ते दोघेही एकत्र आले आणि दोघेही चांगले मित्र झाले. जास्मिनला अली आवडत होता. २०२० मध्ये, अली बिग बॉसच्या घरात वाइल्डकार्ड एन्ट्री म्हणून आला, तिथे त्याने जास्मिनबद्दल असलेल्या भावना कबूल केल्या. तेव्हापासून ते रिलेशनशिपमध्ये आहेत. जास्मिन शीख कुटुंबातून येते, तर अली मुस्लीम आहे. दोघांच्या आंतरधर्मीय नात्याबद्दल जास्मीनच्या कुटुंबाची प्रतिक्रिया काय होती, ते तिने सांगितलं. आता एका मुलाखतीत जास्मिनने तिच्या शीख पालकांनी एका मुस्लीम मुलाबरोबरच्या तिच्या नात्याबद्दल कशी प्रतिक्रिया दिली होती हे सांगितलं. "माझ्या आईवडिलांना अलीबरोबरचं माझं नातं अचानक समजलं.

## सुझानचा स्वभाव कसा आहे?




अभिनेता अली गोनी व अभिनेत्री जास्मिन भसीन ५ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. त्यांनी आपलं नातं लपवून ठेवलं नाही. दोघेही एकत्र इव्हेंट्सला जातात, फिरायला जातात आणि फोटो व व्हिडीओही शेअर करतात. इतकंच नव्हे तर दोघेही एकमेकांबरोबर सण व उत्सव साजरे करतात. अनेकदा त्यांचे कुटुंबीयही त्यांच्याबरोबर असतात. अली गोनी हा हार्दिक पंड्याची पूर्वाश्रमीची बायको नताशाचा एक्स बॉयफ्रेंड आहे. अलीचा चुलत भाऊ अर्सलान गोनी हृतिक रोशनच्या पहिल्या बायकोबरोबर रिलेशनशिपमध्ये आहे. अली व अर्सलानचे कुटुंबीय मूळचे जम्मूचे आहेत. बरेचदा ते कुटुंबाबरोबर सण व खास प्रसंग साजरे करतात. तेव्हा अली व अर्सलान यांच्याबरोबर सुझान व जास्मिन यांचीही भेट होते. अलीची गर्लफ्रेंड जास्मिनला सुझानबद्दल एका मुलाखतीत विचारण्यात आलं. तेव्हा सुझानच्या स्वभावाबद्दल जास्मिन काय म्हणाली, ते जाणून घेऊयात.सुझानने हृतिक रोशनची एक्स पत्नी सुझान खान हिला कुटुंब म्हटलं आहे. अली गोनी हा सुझानचा बॉयफ्रेंड अर्सलान गोनीचा चुलत भाऊ आहे. सुझान खान व अर्सलान गोनी रिलेशनशिपमध्ये आहेत. अली व अर्सलानच्या कुटुंबाचे संबंध चांगले आहेत. त्यामुळे अनेकदा ते एकमेकांना भेटत असतात. या दोन्ही भावांमुळे जास्मिन व सुझानही एकमेकींना भेटतात आणि त्यांचा चांगला बाँड निर्माण झाला आहे. सुझानबद्दल बोलताना जास्मिन म्हणाली, "सुझानबरोबर माझं नातं खूप सुंदर आहे. कारण ती मला भेटलेली सर्वात नम्र, प्रेमळ आणि सर्वात सकारात्मक महिला आहे. माझे खूप मित्र आहेत आणि ते सर्व चांगले आहेत; पण सुझान ही खूप वेगळी खास आहे. तुम्ही तिच्याकडे एखाद्याबद्दल तक्रार केली तरी तिचे उत्तर सकारात्मक असते."सुझानबद्दल बोलताना जास्मिन म्हणाली, "सुझानबरोबर माझं नातं खूप सुंदर आहे. कारण ती मला भेटलेली सर्वात नम्र, प्रेमळ आणि सर्वात सकारात्मक महिला आहे. माझे खूप मित्र आहेत आणि ते सर्व चांगले आहेत; पण सुझान ही खूप वेगळी खास आहे. तुम्ही तिच्याकडे एखाद्याबद्दल तक्रार केली तरी तिचे उत्तर सकारात्मक असते."अभिनेता अली गोनी व अभिनेत्री जास्मिन भसीन ५ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. त्यांनी आपलं नातं लपवून ठेवलं नाही. दोघेही एकत्र इव्हेंट्सला जातात, फिरायला जातात आणि फोटो व

## आमिरने आठवडाभर केली नव्हती अंघोळ

बॉलीवूड अभिनेता आमिर खान हा कायमच वैविध्यपूर्ण कथानकं असलेले चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येतो. आमिर खानचे बरेचसे चित्रपट हे प्रबोधन घडवणारे असतात, तर प्रत्येक चित्रपटात त्याने वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत आणि यातील प्रत्येक भूमिकेसाठी त्याने पुरेपूर मेहनत घेतली आहे. 'दंगल'मधील महावीर सिंग फोगाट या भूमिकेसाठी अभिनेत्याने तब्बल २८ किलो वजन वाढवलं होतं, तर 'गजनी' चित्रपटातील शर्टलेस सीनसाठी फिटनेसकडे लक्ष देऊन सिक्स पॅक ॲप बनवले होते. आमिर खान कायमच त्याच्या प्रत्येक चित्रपटासाठी मेहनत घेताना दिसतो आणि म्हणूनच त्याच्या प्रत्येक चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असतो. अशातच नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आमिर खानने त्याच्याबद्दलचा एक किस्सा सांगितला आहे. 'एबीपी लाईव्ह सुमित' ला दिलेल्या मुलाखतीत त्याने 'राख' चित्रपटातील एक किस्सा सांगत म्हटलं, "'राख' चित्रपटात असे काही सीन आहेत, जिथे मी साकारत असलेल्या पात्राने घर सोडलेलं असतं आणि तो रस्त्यावर राहात असतो."त्यामुळे त्या भूमिकेत शिरण्यासाठी आणि लोकांना मी खरंच बेघर आहे असं वाटावं म्हणून मी खऱ्या आयुष्यात काही दिवस अंघोळ केली नव्हती. जोवर चित्रपटातील त्या ट्रॅकचं चित्रीकरण सुरु होतं तोवर मी अंघोळ केली नव्हती." पुढे आमिरने या मुलाखतीत त्याला 'द परफेक्शनिस्ट' असं संबोधलं जातं याबाबत सांगितलं आहे. तो म्हणाला, "लोक मला 'द परफेक्शनिस्ट' म्हणतात, पण मी स्वत:ला 'परफेक्शनिस्ट' समजत नाही.



## प्रियांका शेजारी रडलेला लोकप्रिय गायक?

हिंदी व पंजाबी संगीत क्षेत्रात मिका सिंगला नावाजलेला गायक म्हणून ओळखले जाते. आतापर्यंतच्या त्याच्या करिअरमध्ये त्याने गायलेली अनेक गाणी गाजली आहेत. मिका सिंग अनेक रिॲलिटी शोमध्ये परीक्षक म्हणून दिसतो. आता एका मुलाखतीत मिका सिंग एका रिॲलिटी शोमधील किस्सा सांगितला आहे. त्यामध्ये प्रियांका चोप्रा हजर होती. मिका सिंगने नुकतीच शुभांकर मिश्राला मुलाखत दिली. या मुलाखतीत मिका सिंगने तो एका रिॲलिटी शोमध्ये का रडला होता आणि त्यानंतर त्याला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले होते, असा खुलासा आहे. मिका सिंग म्हणाला, "कधीकधी मी माझी गाणी ऐकूण रडायचो. मला वाटतं की ते वयच तसं होतं. एका रिॲलिटी शोमध्ये मी दोन ओळी गायल्यानंतर रडलो. आता मी हे कोणाला सांगितलं तर माझ्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. ते म्हणतील की तू काही तानसेनचा मुलगा नाहीस"पुढे मिका सिंग म्हणाला, "त्या रिॲलिटी शोमध्ये मी 'बडे अच्छे लगते है' हे गाणे गात होतो. मला माझंच गाणं ऐकूण आनंद झाला. प्रियांका चोप्रा माझ्याशेजारी बसली होती आणि मी रडायला सुरुवात केली. त्यानंतर मला ट्रोल केले गेले. असे म्हटले गेले की त्याला गाता येत नाही म्हणून तो रडत आहे. सगळी इंडस्ट्री रिॲलिटी शोमध्ये येऊन रडते. तीच गोष्ट मी केली तर लोकांनी मला विचारले की तू हे का करत आहेस?", असे म्हणत मिका सिंगने किस्सा सांगितला.

**लग्न ठरलं!** अर्जुनची साखरपुडा खाजगी समारंभात पार पडल्याची माहिती

# अर्जुन तेंडुलकरचा साखरपुडा!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**क्रिकेटचा देव म्हणून ओळख असणाऱ्या सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकरचा साखरपुडा झाल्याची जोरदार चर्चा सध्या सुरू आहे. २५ वर्षीय अर्जुनचा साखरपुडा सानिया चंडोकशी झाला आहे. सानिया ही प्रसिद्ध उद्योगपती रवी घई यांची नात आहे. अर्जुनचा साखरपुडा खाजगी समारंभात पार पडल्याची माहिती देखील समोर आली आहे. पण सानिया चंडोक नेमकी कोण आहे, जाणून घेऊया.**

## कोण आहे सानिया चंडोक?



सानिया चंडोक ही अर्जुनची बालपणीची मैत्रीण आहे. सानियाचे वडील रवी घई हे देखील सचिन तेंडुलकरचे मित्र आहेत. या दोघांचा साखरपुडा खाजगी समारंभात पार पडला. दोन्ही कुटुंबातील जवळचे सदस्य आणि काही मित्रपरिवार या कार्यक्रमाला उपस्थित होते. सानिया चंडोक ही मोठ्या प्रसिद्ध उद्योजक कुटुंबातील आहे. घई इंटरकॉन्टिनेंटल मरीन ड्राइव्ह हॉटेल आणि ब्रुकलिन क्रीमरी (कमी कॅलरी असलेला आईस्क्रीम ब्रँड) चे मालक आहेत. सानिया चंडोक ही मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपती रवी घई यांची नात आहे.सानिया चंडोक हिने लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्समधून पदवीचं शिक्षण घेतलं आहे. याशिवाय ती मिस्टर पॉजची संस्थापकदेखील आहे. सानिया ही मुंबईतील मिस्टर पॉज पेट स्पा अँड स्टोअर एलएलपीमध्ये भागीदार आणि संचालक आहे. अर्जुन तेंडुलकर हा अष्टपैलू खेळाडू आहे. अर्जुनने आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून पदार्पण केलं आहे. त्याने आतापर्यंत मुंबई इंडियन्सकडून एकूण पाच सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने १३ धावा केल्या आहेत आणि तीन विकेट घेतल्या आहेत. अर्जुनला आयपीएलमध्ये फक्त एकाच सामन्यात फलंदाजीची संधी मिळाली. ज्यामध्ये त्याने ९ चेंडूत एका षटकाराच्या मदतीने १३ धावा केल्या.अर्जुनने २०२३ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले. पण अर्जुन तेंडुलकरला २०२५ च्या आयपीएलमध्ये एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. अर्जुन नवीन चेंडूने चांगली गोलंदाजी करतो आणि खालच्या फळीत फलंदाजीदेखील करू शकतो. अर्जुन तेंडुलकरने आतापर्यंत १७ प्रथम श्रेणी सामने, १८ लिस्ट ए सामने आणि २४ टी-२० सामने खेळले आहेत.भारताचा दिग्गज खेळाडू सचिन तेंडुलकर याचा लेक अर्जुन तेंडुलकर याचा साखरपुडा झाल्याची बातमी सध्या समोर आली आहे. अर्जुन तेंडुलकरचा साखरपुडा हा मुंबईतील प्रतिष्ठित उद्योजक रवी घई यांच्या नातीशी अर्जुनचा साखरपुडा झाल्याचा रिपोर्ट समोर आला आहे. इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, अर्जुन तेंडुलकरचा साखरपुडा रवी घई यांची नात सानिया चंडोकशी झाला आहे. अर्जुन आणि सानियाचा साखरपुडा एका खाजगी समारंभात पार पडला. दोन्ही कुटुंबांतील मोजके सदस्य आणि मित्र या लग्नाला उपस्थित होते.घई कुटुंब हे मुंबईतील एक मोठे आणि प्रसिद्ध व्यावसायिक कुटुंब आहे. तो इंटरकॉन्टिनेंटल मरीन ड्राइव्ह हॉटेल आणि ब्रुकलिन क्रीमरी (कमी कॅलरी असलेला आईस्क्रीम ब्रँड) चे मालक आहे. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ मध्ये अर्जुन तेंडुलकरची कामगिरी पाहायला मिळाली नाही. कारण त्याला संपूर्ण स्पर्धेत एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. मुंबई इंडियन्स (एमआय) ने महालिलावात त्याला ३० लाख रुपयांच्या मूळ किमतीसह संघात कायम ठेवले. पण संघ व्यवस्थापनाने त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये सामील करत खेळण्याची संधी दिली नाही. अर्जुन संपूर्ण हंगाम बेंचवर बसलेला दिसला.अर्जुन तेंडुलकरने आतापर्यंत १७ प्रथम श्रेणी, १८ लिस्ट-ए आणि २४ टी-२० सामने खेळले आहेत. प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये अर्जुनने ३३.५१ च्या सरासरीने ३७ विकेट्स घेतल्या आहेत. त्याने २३.१३ च्या सरासरीने ५३२ धावा केल्या.

### अर्जुनची बालपणीची मैत्रीण

लिस्ट-ए क्रिकेटमध्ये अर्जुनच्या नावावर २५ विकेट्स (सरासरी ३१.२) आणि १०२ धावा (सरासरी १७) आहेत.अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक यांच्या साखरपुड्याबाबत अद्याप तेंडुलकर किंवा घई कुटुंबाने त्यांच्या साखरपुड्याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही. सानिया चंडोक ही अर्जुनची बालपणीची मैत्रीण आहे. सानियाचे वडील रवी घई हे देखील सचिन तेंडुलकरचे मित्र आहेत.

## इंडिया पाकिस्तानवर बहिष्कार टाकणार?

### भारत वि. पाकिस्तान सामना रद्द होणार असल्याची चर्चा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तानचे संघ आमनेसामने येणार असल्याचं वेळापत्रकामुळे निश्चित झालं आहे. आशिया चषक २०२५ येत्या ९ सप्टेंबरपासून खेळवला जाणार आहे. तर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ सप्टेंबरला होणार आहे. पण आता हरभजन सिंगच्या वक्तव्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना रद्द होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.**



“रक्त आणि पाणी एकत्र नसतं. आपण त्यांना इतकं महत्त्व का देतो?” असा प्रश्न हरभजन सिंगने उपस्थित केला आहे. आशिया चषकामध्ये भारत आणि पाकिस्तान एकमेकांविरूद्ध खेळणार असल्याच्या मुद्द्यावर बोलताना हरभजनने हे वक्तव्य केलं आहे.भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या तणावामुळे आशिया चषकातील सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी सातत्याने होत आहे. हरभजन सिंग अलीकडेच वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स स्पर्धेचा भाग होता, जिथे इंडिया चॅम्पियन्सने पाकिस्तान चॅम्पियन्सविरुद्ध गट सामना आणि सेमी-फायनल सामने खेळण्यास नकार दिला. या संघात शिखर धवन, युवराज सिंग, हरभजन सिंग, इरफान पठाण, सुरेश रैना आणि युसूफ पठाण यांसारख्या अनुभवी खेळाडूंनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबर खेळण्यास स्पष्टपणे नकार दिला. आता आशिया कप (ASIA CUP 2025) आधी, हरभजन सिंगचं म्हणणं आहे की, देश सर्वप्रथम येतो आणि सूर्याच्या नेतृत्वाखालील टीम इंडियानेही पाकिस्तानबरोबर खेळण्यास नकार द्यावा.

### पाकिस्तानबरोबर खेळण्यास नकार

हरभजन सिंगने सांगितलं, “कोणत्या गोष्टींना महत्त्व दिलं पाहिजे, हे समजून घेतलं पाहिजे. खरंतर अगदी सोपं आहे. आपल्या देशाचा जवान सीमेवर उभा आहे. त्यांच्या कुटुंबापासून ते दूर राहतात. अनेकप्रसंगी त्यांना वीरमरण येतं, शहीद होतात आणि पुन्हा आपल्या घरीदेखील परतू शकत नाही. जवान आपल्यासाठी खूप मोठा त्याग करतात. या जवानांच्या तुलनेत आपण एक साधा क्रिकेट सामना सोडू शकत नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार।
। दि. 14 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



## राज्यभरातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या

# प्रश्नांवर तोडगा काढण्याचा निर्धार!

### शशिकांत झिंजुर्डे: कामगार संघटनांचा राज्यव्यापी मेळावा पिंपरीत उत्साहात



| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील कामगार-कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांचा एकत्रित राज्यव्यापी मेळावा पिंपरी-चिंचवड येथे पार पडला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या कार्यालयात आयोजित या मेळाव्याला राज्यभरातील प्रमुख शहरांमधील कामगार नेत्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली.**

या मेळाव्याचे उद्घाटन फेडरेशनचे प्रवक्ते श्री. गौतम खरात यांनी केले. मेळाव्याचे आयोजन पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. राज्यातील बृहन्मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), नवी मुंबई, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, लातूर, धुळे, जळगाव, परभणी, इचलकरंजी, भिवंडी, मालेगाव, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, सांगली-मिरज-कुपवाड आदी २५ पेक्षा अधिक शहरांतील कामगार प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

या मेळाव्यात प्रामुख्याने पुढील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली: 1. काही महानगरपालिकांमध्ये ३ ते ४ महिन्यांपासून कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेले नाही. 2. जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी. 3. मनपा क्षेत्रातील वाढते कंत्राटीकरण आणि त्यावरील चिंता. 4. कंत्राटी कामगारांना नियमित सेवेत समाविष्ट करणे. 5. नर्सिंग कौन्सिल आणि सलीम मर्चंट पुरस्कारानुसार रुग्णालयातील कर्मचारी व रुग्ण यांचे प्रमाण निश्चित करणे. 6. सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी दर्जेदार वैद्यकीय सेवा लागू करणे.

मेळाव्याच्या समारोपात सर्व उपस्थित कामगार नेत्यांनी एकमुखी ठराव करून या मागण्यांसाठी लढा तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला.

> "राज्यभरातील महानगरपालिका कामगार व कर्मचाऱ्यांचे प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. आम्ही शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करत आहोत, परंतु आता संयमाची परिसीमा झाली आहे. येत्या २४ ऑगस्टच्या मेळाव्यात आंदोलनाची पुढील दिशा ठरवून, या मागण्यांसाठी निर्णायक लढा उभारण्याचा आमचा निर्धार आहे."
> **-शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे, - अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य महानगरपालिका-नगरपालिका कामगार-कर्मचारी संघटना फेडरेशन.**

त्यानुसार, २४ ऑगस्ट २०२५ रोजी थेरगाव येथील स्व. शंकर (आण्णा) गावडे स्मृती कामगार भवन येथे दुसऱ्या राज्यव्यापी मेळाव्याचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या मेळाव्यात पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात येणार असल्याचे श्री. झिंजुर्डे यांनी स्पष्ट केले.

या वेळी उपस्थित प्रमुख नेत्यांमध्ये शशांक राव, रमाकांत बने, अशोक जाधव, वामन कविस्कर (बृहन्मुंबई), मोहन तिवारी, चेतन आंबोणकर, वीरपाल भाल (ठाणे), उदय भट, मधुकर राकेश विटकर (पुणे), जगदीश देशमुख (नाशिक), ॲड. स्वप्निल काशीद (नवी मुंबई), गणेश शिंगे (नांदेड), केशव आंधळे (परभणी), दिलीप शिंदे (सांगली), प्रल्हाद कोतवाल (अमरावती), विकास लगारे (इचलकरंजी), दिनकर आवाळे, अजित तिवले (कोल्हापूर), सतिश चंडालिया, अनिल कांबळे (पनवेल), दीपक राव (भिवंडी), बापूसाहेब सदाफुले (सोलापुर), अंकुश गायकवाड (लातूर), प्रविण तंतरपाळे (नागपूर), रमेश जगताप (मालेगाव) यांचा समावेश होता. मेळाव्याचे सूत्रसंचालन श्री. गौतम खरात यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. मोहन तिवारी यांनी केले.



# खेड तालुक्यातील गारगोटवाडीच्या पाणीटंचाईला सोलर प्लांटमुळे दिलासा!

## महिंद्रा आणि महिंद्राचा पुढाकार; सोलर पीव्ही पाणीपुरवठा प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी: महाईन्यूज

**खेड तालुक्यातील गारगोटवाडी गावात दीर्घकाळ चाललेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर आता सोलर पद्धतीच्या माध्यमातून तोडगा काढण्यात आला आहे. महिंद्रा अँड महिंद्रा लि. (इंजिन प्लांट), चाकण आणि यश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गावात सौरऊर्जेवर आधारित सोलर पीव्ही पाणीपुरवठा प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आला आहे.**





या प्रकल्पाचे उद्घाटन महिंद्रा अँड महिंद्रा लि. (इंजिन प्लांट), चाकणचे प्लांट हेड संजय क्षिरसागर यांच्या हस्ते पार पडले. या वेळी गावचे सरपंच वर्षाताई बच्चे, उपसरपंच रोहिणी गारगोटे, यश फाउंडेशनचे अध्यक्ष रविंद्र पाटील, तसेच स्थानिक प्रशासनाचे अधिकारी आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य दत्ताभाऊ कंद यांनी केले.यश फाउंडेशनचे स्वयंसेवक, थ्रिजी सोलर एनर्जीचे संचालक दीपक तारू यांचीही या उपक्रमात महत्त्वाची भूमिका होती.

दररोज १.१० लाख लिटर पाणीपुरवठा सोलर पीव्ही प्रणाली अंतर्गत २३ किलोवॅट सोलर पॅनल्स, २५ एचपी कंट्रोलर आणि १७.५ एचपी मोटरचा वापर करण्यात आला आहे. हा संपूर्ण प्रकल्प सौरऊर्जेवर चालतो आणि दररोज १ लाख १० हजार लिटर स्वच्छ पाणी गावकऱ्यांना पुरवतो. या सुविधेचा थेट फायदा गारगोटवाडीतील १५५० ग्रामस्थांना होणार आहे.

### गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार

या वेळी बोलताना संजय क्षिरसागर म्हणाले, “महिंद्रा कंपनी गारगोटवाडीच्या पाणीटंचाईच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय नजीकच्या काळात करण्यात येणार आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून स्वच्छ व पर्यावरणपूरक उपाययोजना केल्या असून, ही मोहीम कंपनी, सामाजिक संस्था आणि ग्रामस्थांच्या एकत्रित सहभागातूनच शक्य झाली आहे. असेच एकत्रित प्रयत्न केल्यास गाव निश्चितच आदर्श गाव बनू शकतो.”

# भोसरीत अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक व्हावे!

## आमदार महेश लांडगे यांना राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे यांचे निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी: महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**





पिंपरी-चिंचवड: संपूर्ण देशासाठी प्रेरणास्रोत ठरलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे भव्य पूर्णाकृती स्मारक भोसरी विधानसभा मतदारसंघात उभारण्यात यावे, अशी ठाम मागणी राष्ट्रीय खेळाडू आणि समाजसेवक अरुण सर पाडुळे यांनी केली आहे. त्यांनी आज भोसरीचे आमदार आणि हिंदुत्ववादी नेते महेश किसनराव लांडगे यांना यासंदर्भात निवेदन सादर करून स्मारकाच्या उभारणीसाठी तातडीने पावले उचलावीत, अशी विनंती केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार, उत्तम न्यायव्यवस्था आणि आदर्श प्रशासनाची पायाभरणी करून एक आदर्श शासिका म्हणून इतिहासात आपले अढळ स्थान निर्माण केले. त्यांचे कार्य भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे पाडुळे यांनी निवेदनात नमूद केले.

पिंपरी चिंचवड शहरात धनगर समाजाचे मोठे प्रमाण असल्याने, त्यांच्या श्रद्धास्थानी असलेल्या पुण्यश्लोक मातेचे स्मारक हे समाजाच्या भावना जोपासणारे ठरेल. स्मारकाभोवती अहिल्यादेवींच्या जीवनप्रवासावर आधारित शिल्पाकृती उभाराव्यात, जेणेकरून त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचेल आणि प्रेरणा मिळेल, अशीही मागणी पाडुळे यांनी केली. या मागणीला भोसरी मतदारसंघातील नागरिकांनी आणि विविध सामाजिक संघटनांनीही पाठिंबा दर्शविला असून, लवकरच या मागणीला अधिक व्यापक स्वरूप देण्यात येईल, असे संकेतही यावेळी देण्यात आले.

> “पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य हे आजच्या समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. त्यांचे स्मारक उभारल्यास केवळ इतिहासाची जपणूक होणार नाही, तर नव्या पिढीला सुसंस्कार, न्यायप्रियता आणि नेतृत्वाची प्रेरणा मिळेल. भोसरी विधानसभा मतदारसंघात हे स्मारक उभे राहणे ही काळाची गरज आहे.”
> **–अरुण पाडुळे, अध्यक्ष,** पुण्यश्लोक राजमाता प्रतिष्ठान.

# विद्यार्थ्यांनी व्यक्त केली 'स्वत:बद्दल कृतज्ञता'

## शिक्षण विश्व: संत साई शाळेत क्रांती दिन सप्ताह साजरा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी: महाईन्यूज

**संत साई स्कूल, भोसरी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रांती दिन सप्ताह ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यावर्षी हा सप्ताह "कृतज्ञता वर्ष"म्हणून साजरा होत असून, समाजासाठी योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींप्रती आदर आणि आभार व्यक्त केले जात आहेत.**



पाचव्या दिवशी स्वतःबद्दलचा आदरभाव आणि कृतज्ञता या विषयावर कार्यक्रम झाला. सुरुवातीला भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन आणि ज्योत प्रज्वलन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर आणि प्रमुख पाहुणे डॉ. अजित जगताप उपस्थित होते. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, पथनाट्य आणि कविता सादर करून स्वतःच्या शरीर, मन आणि आत्म्याबद्दल कसे कृतज्ञ रहावे, हे दाखवले. यथार्थ तांबडे याने 'स्वतःसाठी थोडं जगणा रे...' ही कविता सादर केली, तर अनुष्का शहाणे हिने 'अगं स्वतःलाच विसरली का? ही कविता सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

मुख्याध्यापक ढवळेश्वर यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य, स्वभाव आणि अभ्यास या तीन गोष्टींचे महत्त्व सांगितले. डॉ. जगताप यांनीही स्वावलंबन, स्वाभिमान आणि आत्मसन्मान यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन मुग्धा लोंढे व प्रगती प्रसाद या विद्यार्थिनींनी केले. आभार प्रदर्शन संस्कृती लांडगे हिने केले. कार्यक्रमाला अनेक पालक, शिक्षक आणि शाळेच्या विश्वस्त यांची उपस्थिती लाभली.

"हर घर तिरंगा" उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी परिसरात रॅली काढली. त्यांच्या देशभक्तीच्या घोषणा परिसरात घुमल्या. या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचा समारोप "वंदे मातरम्" गीताने झाला.



# एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये रक्षाबंधन साजरे

## शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांसाठी 'राखी बनवण्याची कार्यशाळा' संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी: महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**





भोसरीतील एस. पी. जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये रक्षाबंधनाचा सण मोठ्या आनंदात, उत्साहात आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे अध्यक्ष पांडुरंग नाना गवळी आणि उपाध्यक्ष सुनीता गवळी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक प्रार्थनेने झाली. त्यानंतर शाळेचे शैक्षणिक समन्वयक नितीन लोणारी, मुख्याध्यापक प्रविण गायकवाड, व शिक्षिका सुप्रिया मुळे यांनी विधिवत सरस्वती पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी विद्यार्थ्यांना रक्षाबंधन साजरे करण्यामागील सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. बहीण-भावाच्या नात्यातील प्रेम, आपुलकी आणि सुरक्षा यांचा सन्मान करण्यासाठी हा सण साजरा केला जातो, हे उदाहरणासह स्पष्ट करण्यात आले. विशेष आकर्षण म्हणून विद्यार्थ्यांसाठी 'राखी बनवण्याची कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता आणि कल्पकता वापरून विविध रंगीबेरंगी, आकर्षक राख्या तयार केल्या. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी शाळेतील विद्यार्थ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले . संपूर्ण वातावरण आनंददायी आणि प्रेमळ नात्याच्या भावनांनी भारावून गेले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या व मिठाईचे वाटप करण्यात आले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये एकोपा, स्नेहभावना आणि भारतीय संस्कृतीतील कुटुंबवत्सल मूल्यांची बीजे पेरली गेली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आणि अविस्मरणीय अनुभव ठरला. रक्षाबंधनासारख्या पवित्र सणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, प्रेम आणि ऐक्याची भावना वृद्धिंगत करण्यात शाळेला यश आले, याचा सर्व शाळा परिवाराला मनस्वी आनंद झाला.